# —: बक्षीस पत्र :—

## "गुरुकुल शिक्षण संस्था पुनावळे"


G. 32/2001

गुरुकुल शिक्षण संस्था

जनार्दन कोंडीराम रणनवरे
बी.ए.एम.पी.एम,एल.एल.बी.
ॲडव्होकेट
डांगे चौक, थेरगांव, पुणे-३३.
फोन नं. : ७४५६७९९

जनार्दन कोंडीराम रणनवरे
बी.ए.एम.पी.एम,एल.एल.बी.
ॲडव्होकेट
डांगे चौक, थेरगांव, पुणे-३३.
फोन नं. : ७४५६७९९

100Rs.




मि, र. नं. 3209 दि. 3/7/2001 मु. रुपये 100/-
नाव व पत्ता श्री/श्रौ. मुरलीधर भागुजी ओव्हाळ
रा. फुगावळे, ता. मुळशी हस्ते ॲड. रणनवरे
जि. पुणे सही Adv Ranawre

V. B. Lonkar
व्ही. बी. लोणकर
(स्टॅम्प व्हेंडर, पुणे)

3 JUL 2001

NOTARY
VILAS ANANT KUTE AKURDI PUNE - 35
Reg. No. 1519
GOVERNMENT OF INDIA

// श्री गजानन प्रसन्न //

// प्रतिज्ञापत्र //

आज रोजी दि. ३ माहे जुलै सन २००१ श्री शके १९२३ मिती ~~मंगळवार~~
आषाढ शु. १३ वार मंगळवार हसवी ते दिवशी

गुरुकुल शिक्षण संस्था पुनावळे ]
ता. मुळशी, जि. पुणे यांचेतर्फे ]
अध्यक्ष / संस्थापक श्री. प्रल्हाद ] लिहून घेणार
भागुजी ओव्हाळ ]
वय ५२ वर्षे, व्यवसाय- समाजकार्य ]
रा. पुनावळे ता. मुळशी जि. पुणे. ]

यांसी

१] श्री. मुरलीधर भागुजी ओव्हाळ ]
वय ४८ वर्षे, व्यवसाय- शेती ]
२] श्री. गौतम भागुजी ओव्हाळ ]
वय ४५ वर्षे, व्यवसाय- शेती ] लिहून देणार
३] श्री. धनश्री भागुजी ओव्हाळ ]
वय ४३ वर्षे, व्यवसाय- शेती ]
श्रीमती अनुसया भागुजी ओव्हाळ ]
वय ७५ वर्षे, व्यवसाय- घरकाम ]
सर्व रा. पुनावळे, ता. मुळशी जि. पुणे. ]

यांसी,

१] श्री. मोहन बापू ~~ओव्हाळ~~ ओव्हाळ ]
वय ५० वर्षे, व्यवसाय- समाजकार्य व शेती ]
२] श्रीमती ठकुबाई बापू ओव्हाळ ] ~~लिहून~~ संमती देणार.
वय ८० वर्षे, व्यवसाय- घरकाम ]
दोघेही रा. पुनावळे, ता. मुळशी जि. पुणे. ]

कारणे ~~न~~ बक्षीसपत्र लिहून देतो की,

१] मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी तालुका मुळशी मे.

Scanned with OKEN Scanner

सब रजि. तां. मुळशी व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या त समाविष्ट असलेले गाव मौजे पुनावळे एकत्र कुटुंबातील एकूण क्षेत्रापैकी माझ्या वाट्याला आलेले अविभक्त हिश्यापैकी क्षेत्र स. नं. १० मधील क्षेत्र १ हे. १ आर पोट खराब्यासह आकार ४ रु. ०० पै. पैकी ० हे. ५ आर सदर मिळकत या बक्षीस पत्राचा विषय असून यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे

पुर्वेस - श्री. रघुनाथ लालू ओव्हाळ यांची मिळकत

पश्चिमेस - श्री. महादू ढकू ओव्हाळ यांची मिळकत

दक्षिणेस - श्री. मोहन बापू ओव्हाळ यांची मिळकत

उत्तरेस - श्री. बळवंत मारुती ओव्हाळ यांची मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक असलेली मिळकत व त्यातील दगड धोंडा माती लोह लोखंड लाकुड फाटा जल तरु तृण काष्ट पाषाण तदंगभूत वस्तुसह जाण्यायेण्याच्या वहिवाटीच्या रस्त्यासह कोणताही हक्क मागे राखून न ठेवता दरोबस्त.

२] वर कलम १ यात वर्णून केलेल्या जमीन मिळकतीचा उल्लेख सोई साठी दत्त मिळकत अथवा मिळकत असा करण्यात येईल.

३] वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत आमचे वडिलोपार्जित मालकी हक्क ताबे वहिवाटीची असून वारसा हक्काने आम्हांस मालकी प्राप्त झाला आहे. तशी गाव दप्तरी ७/१२ च्या उतान्यावर दर्शविल्या प्रमाणे आमचे नावाची नोंद देखील आहे. तसेच सरकारी / निमसरकारी

कागदोपत्री आमचे नावाची नोंद देखील आहे. सदर मिळकतीचा आम्ही पट्टी पाणीपट्टी भरून तालोताल उपभोग घेत आहोत. सदर मिळकत विक्री करण्याचा, विल्हेवाट लावण्याचा उपभोग घेण्याचा व्यवसाया करण्याचा आम्हांस पूर्णपणे हक्क व अधिकार होता व आहे.

४] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे लिहून घेणार व लिहून देणार यांचे मालकी व त्यांचे ताबे व कब्जे वहिवाटीत असणा-या मिळकतीपैकी पाच आर क्षेत्र या बक्षीसपत्राने द्वारे, गुरुकुल शिक्षण संस्था पुनावळे यांना देत आहे. त्यांनी त्याचा उपयोग प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाकरीता करण्याचे ठरविले आहे. लिहून घेणार हे सदर संस्थेचे अध्यक्ष / संस्थापक आहेत. ते नेहमी हिंडते फिरते असून त्यांना समाज कार्य करण्याची व शिक्षणाची फार आवड असल्याने पुनावळे गावात मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होत असल्याची जाणीव व माहिती उणीव असल्याने लिहून देणार व लिहून घेणार यांनी स्वखुशीने आम्ही गुरुकुल शिक्षण संस्था रजि. नं. महाराष्ट्र ७६३/२००१ आहे. पुनावळे यांना बक्षीस देत आहे. व त्यास संमती देणार नं. १ ते २ यांनी संमती दिली आहे. सदर मिळकत नवीन शर्तीची असल्याची जाणीव व माहिती आम्हास आहे.

५] वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत निर्वेध निजोखमी

बोजारहीत असून तिचेवर इतर कोणाचा अन्नवस्त्र पोटगी कुळ खंडकरी बँक कर्ज मालकी दावा, तावे शहिवाट वारसा हक्क वा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा अगर चार्ज नाही. तसेच सदरची मिळकत आम्ही दुसरे कोणासही गहाण, दान, बक्षिस, खरेदी लिन लिज व अन्य कोणत्याही प्रकारे तबदील किंवा हस्तांतर करुन दिलेली नाही. अगर तशा प्रकारचा दुसरे कोणाही बरोबर लेखी अगर तोंडी करार मदार केलेला नाही.

६] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे आज पर्यंतचे सर्व शासकीय कर लिहून देणार यांनी भरला असून यापुढील येणारे सर्व कर लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचे मालक म्हणून भरावयाचे आहेत. मागील काही बाकी निघाल्यास लिहून देणार यांनी भरावयाची आहे.

७] सदर मिळकती बाबत कोणत्याही कोर्टात अगर कचेरीत दाव्या चा अगर वादाचा विषय नाही. तसेच सदरील जमीन अँकवीझिशन रिक्वीझीशन रिझर्वेशन खाली येत नाही अगर तशा प्रकारची नोटीसही आज पावेतो आम्हास आलेली नाही. अशा प्रकारे निर्वेध निजोखमी निष्कर्जी प्रस्तुतचे बक्षिसपत्र तुमचे नावे लिहून व नोंदवून देवून आज रोजी तुम्हास पूर्णपणे बक्षिसपत्राने दिली आहे.

८] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे क्षेत्र हद्दीत, खुणा, निश्चीत करुन सदरील मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला कब्जा आज रोजी आम्ही तुम्हांस खालील साक्षीदारांसमक्ष पूर्ण मालकी हक्काने दिला आहे व सदरहुन मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा तुम्ही घेवून हद्दीच्या खाणा खुणा पाहून मालकी हक्काने प्रत्यक्ष घेतला आहे. सदर मिळकतीवर आम्ही अगर आमचे वालीवारस वगैरे या कोणताही हक्क हितसंबंध मालकी ताबा वहिवाट वगैरे राहीलेला नाही. या बक्षिसपत्राने सदरील जमीन मिळकतीचे आम्हांस प्राप्त असणारे सर्व कायदेशीर हक्क हितसंबंध व मालकी हक्क तुम्हास प्राप्त झालेले आहेत.

९] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे प्रस्तुतचे बक्षिसपत्राने तुम्ही पुर्णपणे मालक व कब्जेदार झाले असल्याने यापुढे सदरील जमीनीचा तुम्ही मालकी हक्काने वंशपरंपरेने पुत्र पौत्रादी मनमानेल तशी वहिवाट करुन निरंतर उपभोग घ्यावा. अगर मर्जीप्रमाणे विल्हेवाट व्यवस्था लावावी. सदरील जमीनीचे तुमचे मालकी हक्कास ताबे वहिवाटीस व उपभोगास आमचे कोणी वालीवारस सावसावकार मुखत्यार वगैरेंनी हिल्ला हरकत, कोर्ट दरबार केल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा आढळून आल्यास त्या सर्वाचे संपूर्ण निवारण व निराकरण आम्ही आमचे स्वखर्चाने करुन देवू व आमचे पश्चात आमचे वालीवारस आप स्वखर्चाने

करुन देतील त्याची कोणतीही तोषीस तुम्हास लागू देणार नाही.

१०] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीस गाव दप्तरी ७/१२ चे उतार्‍यास व अन्य सरकारी दप्तरी कागदोपत्री तुम्ही तुमचे नावाची नोंद मालक कब्जेदार वहिवाट सदरी दाखल करुन घ्यावी त्यासाठी आवश्यक ते अर्ज जाबजबाब सह्या संमती वगैरे आम्ही विना मोबदला विनातक्रार समक्ष हजर राहून देवू.

११] वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे आजपर्यंतचे सर्व सरकारी, निमसरकारी कर शेतसारा पट्या पासोड्या आम्ही पूर्णपणे भरलेल्या आहेत. यापुढील सदरचे सर्व कर वगैरे तुमचे तुम्ही मालक या नात्याने भरावयाचे आहेत. मागील कराची कोणतीही बाकी निघाल्यास ती आम्ही ताबडतोब भरुन पूर्ण करुन देवू त्याची तोषीस तुम्हास लागू देणार नाही.

येणेप्रमाणे वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा सदरचे बक्षिसपत्राने आम्ही आमचे वालीवारस कायदेशीर मुखत्यार भाऊबंद सावकारसावकार इ. वर बंधनकारक आहे व राहील.

भोग,वटयाचा कागदपत्राचा तपशिल :-

१] सदर मिळकतीचा ७/१२ चा उतारा
२] सदर मिळकतीचे फेरफार उतारे

..८..

३. सदर मिळकतची सरकारी कर भरल्याच्या पावत्या

सदर मिळकतीच्या बक्षिसपत्राचा सर्व मुद्रांक शुल्क नोंदणी फी वकील फी सर्व खर्च तुम्ही लिहून घेणार यांनी केलेला आहे.

येणेप्रमाणे सदरील बक्षिसपत्र लिहून देणार यांनी स्वतःचे राजीखुशीने अक्कलहुशारीने समजून उमजून वाचून लिहून व नोंदवून दिले असून त्यावर लिहून देणार यांनी साक्षीदारांसमक्ष सही आंगठा केला असून साक्षीदारांनी आपआपल्या सह्या लिहून देणार यांचे समक्ष केल्या आहेत.

साक्षीदार :-

१. सही- [signature]
नांव- अरुण जयवंत ओव्हाळ
पत्ता- पुनवळे पुणे

२. सही- जोरक्ष गोविंद दरेकर
नांव- गोरक्ष गोविंद दरेकर
पत्ता- मु.पो. पुनवळे

I know the Affiant
[signature]

लिहून देणार

× [signature]

१] श्री. मुरलीधर भागुजी ओव्हाळ

× गौतम भागुजी ओव्हाळ

२] श्री. गौतम भागुजी ओव्हाळ

× [signature]

३] श्री. धनाजी भागुजी ओव्हाळ

× [signature]

४] श्रीमती अनुसया भागुजी ओव्हाळ

मोहन वापु ओव्हाळ

५) श्री मोहन बापू ओव्हाळ

श्रीमती छकुबाई बापु ओव्हाळ
[signature]

BEFORE ME

VILAS ANANTA KUTE
Advocate & Notary (Govt. of India)
Vitthalwadi, Akurdi, Pune - 35
☎ 7658324

7/7/2001

VILAS ANANTA KUTE
NOTARY
GOVT. OF INDIA
Reg. Number 335

Noted and Registered
at Serial Number 4/32/2001.